ISSN

2019-20
स्वांवत सत

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - II

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार<br>**प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार** | १-३ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वकिली व्यवसायविषयक विचार<br>**प्रा. दत्तात्रय रामकिशनराव मुंडे** | ४-८ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व शिक्षणविषयक विचार<br>**प्रा. डॉ. जितेश नारायण चव्हाण** | ९-१५ |
| ४ | महाडची सामाजिक क्रांती : चवदार तळे सत्याग्रहाच्या विशेष संदर्भात<br>**प्रा. डॉ. कैलाश फुलमाळी** | १६-२० |
| ५ | हिंदूकोड बिल आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री उन्नती विषयक विचार<br>**प्रा. मनिषा श्रेणिककुमार पाटील** | २१-२३ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आर्थिक विचार<br>**डॉ. मीना गीताराम मेहत्रे** | २४-२८ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दीक्षाभूमी<br>**डॉ. ओमशिवा लिगाडे** | २९-३१ |
| ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरणासाठी योगदान<br>**डॉ. पौर्णिमा शिरिष कोल्हे** | ३२-३४ |
| ९ | नवभारताच्या घटनेचे प्रमुख शिल्पकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**श्री. अजितकुमार भिमराव पाटील** | ३५-४० |
| १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार - एक काळाची गरज<br>**प्रा. रसाळ दशरथ किसन**<br>**प्रा. डॉ. विष्णु बी. वाघमारे** | ४१-४५ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ओबीसी बाबातचा दृष्टीकोन<br>**प्रा. भाऊसाहेब खंडू सांगळे** | ४६-४८ |
| १२ | इतिहास लेखन, पुर्नलेखन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत** | ४९-६२ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार<br>**प्रा. परमेश्वर दत्ताराव यादव** | ६३-६७ |

# १२. इतिहास लेखन, पुर्नलेखन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ. सावंत जयपाल चंद्रकांत
शिवाजी विद्यापीठ संलग्नीत शंकरराव जगताप आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज वाघोली, ता. कोरेगाव, जि. सातारा.

## प्रस्तावना

या शोधनिबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकिय इतिहासाच्या विश्लेषित करण्याला इतिहास म्हणून पुर्णतः स्विकारलेले नाही. आजही अनेक भारतीय लेखकांच्या ऐतिहासिक संशोधन पध्दतीच्या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इतिहासाची व्याख्या मांडण्यात आलेली दिसत नाही. ही परिस्थिती येण्याचे कारण म्हणजे आजही भारतीय जातीप्रथा आणि अस्पृश्यता या दोन मुद्दयांना भारतीय इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त झालेले नाही. आजही जातीसंदर्भातील अभ्यास भारतात सामान्यतः समाजशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञच करतात आणि दुसरी महत्वाची बाब म्हणजे भारतीय इतिहास संशोधनामध्ये ज्या संशोधन पध्दतींचा वापर केला जातो त्या सर्व युरेपियन म्हणजेच पाश्चिमात्य पध्दती आहेत. उदा. मार्क्सवाद, उपयोगितावाद, संरचनावाद, उत्तरसंरचनावाद इ. होय. या सर्व विचारसरणींच्या बाबतीत काही वाईट नाही परंतू यांचा अभ्यास करताना आपले अभ्यासक म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा पेरीयार यांच्या ऐतिहासिक अभ्यासास कोणतीच जागा देत नाहीत. त्यामुळेच मी या संशोधनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या इतिहास अभ्यासाच्या दृष्टीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतिहासाची व्याख्या मांडताना म्हणतात कि, "इतिहासाकडे नेहमी बदल म्हणून पहावे. कारण इतिहास हा नेहमी राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थिती बदलवीत असतो म्हणून इतिहास म्हणजे बदल"[१]

इतिहासकाराचे कर्तव्य काय याबाबत मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोथे यांचे विश्लेषण देतात "असत्यापासून सत्याचा निवाडा करणे, अनिश्चितापासून निश्चिताला वेगळे काढणे आणि निश्चयात्मकपणे अमान्य होण्यासारख्या बाबीपासून शंकास्पद बाबी वेगळया करणे हेच इतिहासकाराचे कर्तव्य होय. संशोधकासमोर जी माहीती उपलब्ध असेल तिच्याकडे साकल्याने न्यायाधिशाच्या निष्पक्षपाती दृष्टीकोनातून त्याने पाहिले पाहिजे. एखाद्या घटनेविषयी केलेले विधान पुराव्यानुसार पाहता कितपत परिपुर्ण व स्पष्ट आहे याचा विचार करावयास हवा आणि त्याबद्दल नंतरच आपला निष्कर्ष काढून आपला अभिप्राय द्यावयास पाहिजे. मग तो निष्कर्ष पूर्वीच्या इतिहासतज्ञाने नोंदवलेल्या मताशी जुळणारा असो की नसो."[२]

डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक मोठा समृध्द वारसा आपणा सर्वांना देऊन गेलेले आहेत. महात्मा फुल्यांनी महाराष्ट्रच नव्हे तर भारत देशातच प्रथमतः मांडलेला परिवर्तनाचा विचार त्यांच्यानंतर तितक्याच प्रगल्भतेने पुढे नेण्याचे कार्य डॉ.आंबेडकरांनी केलेले आहे. भारतीय समाजाच्या विचाराचा प्रारंभ वर्गापासून व्हावा आणि तो वर्ण, जाती व अस्पृश्यता या क्रमाने पोटजातीपर्यंत यावा. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाचा सामाजिक इतिहास तपासला आणि त्या तपासणीत त्यांना वर्गजाणीव, वर्ग संघर्ष आणि वर्ग युध्द या गोष्टी आढळल्या. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास "India is the land where there has been fought a class war between Brahmans and Kshatriyas which lasted for several generations and which was fought so hard and with-such virulence that it turned but to be a war of extermination." [3]

डॉ.बाबासाहेब आंबेडकारांनी आपली इतिहासविषयक वेळोवेळी मत स्पष्ट केलेले आहे. त्यात भौतिक परिस्थितीसोबतच इतिहास निर्मीती करण्यात मानवाचाही वाटा तितकाच महत्वाचा असतो हे स्पष्ट केलेले आहे. मानवी जीवनात आपल्या आजूबाजूच्या परीस्थितीवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नात परिस्थीतीला कसे बदलवले हे शोधून काढणे हे इतिहासमिमांसेचे अंतिम उद्दिष्ट असते.[4] वास्तव कधीही एकांगी नसते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जी इतिहास मीमांसा आपल्यासमोर मांडली आहे ती परिपुर्ण होती असा बाबासाहेबांचा मुळीच दावा नव्हता. उलट आपण केलेल्या मीमांसेचे कठोर परिक्षण व्हावे आणि यापेक्षा अधिक चांगली मीमांसा जर कोणी केली तर तिचे मनःपुर्वक स्वागत करावे हीच या प्रज्ञावंताची सतत भूमिका राहीलेली आहे.[5]

एकच बाब सातत्याने योग्य असल्याचे सतत समाजासमोर मांडली जात असेल तर त्या मागील हेतू काय आहेत याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. हे पुर्वग्रहदुषीत असलेले दृष्टीकोन ऐतिहासिक संशोधनास कसे त्रासदायक असतात याचे विवेचन करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "हिंदूंचे पवित्र वाङःमय म्हणजे तरी काय? हे वाङःमय म्हणजे जवळ जवळ सर्वस्वी ब्राम्हणांनी उत्पन्न केलेले वाङःमय आहे. दुसरे असे की ब्राम्हणेतरांपेक्षा ब्राम्हणांना जे श्रेष्ठपणाचे अधिकार आणि हक्क आहेत त्याची जोपासना करणे हाच मुख्य हेतू त्या वाङःमयाचा आहे. अशी स्थिती असताना ब्राम्हणांनी त्या वाङःमयाच्या पाविHयाला उचलून का धरू नये बरे? ज्या कारणामूळे ते पाविHय उचलून धरावे असे ब्राम्हणाला वाटते त्याच कारणामुळे त्या पाविHयाला धिक्कार करावा असे ब्राम्हणेतराला वाटते......हिंदूंच्या सामाजिक इतिहासाचे जे प्रश्न आहेत त्यांचा अभ्यास करावयाची मुख्य साधनसामुग्री म्हणजे हिंदूंचे पवित्र वाङःमय होय. ब्राम्हण विद्वान गृहस्थ आणि ब्राम्हणेतर विद्वान गृहस्थ यांचे पवित्र वाङःमयाकडे पाहण्याचे जे दृष्टीकोन आहेत त्यांच्यात कसा फरक आहे हे वर सांगितले आहे. हा फरक ऐतिहासिक संशोधनाला अत्यंत हानिकारक आहे."[6]

"प्रत्येक धर्मातील पवित्र ग्रंथांबद्दल आदरभाव दाखवला पाहिजे.' असा आदरभाव हिंदूंच्या धार्मिक पवित्र ग्रंथाबद्दल मी दाखविला नाही असे माझ्याबद्दल म्हणण्यात येईल. हा आरोप जर खरा मानला तर माझ्या बाजूचे समर्थन करण्यासाठी दोन गोष्टींचा आधार घेणे मला भाग पडते. सर्व वाङ्मय ग्राम्य (लोकासंबंधीचे वाङ्मय या मूळ अर्थाने ग्राम्य हा शब्द मी वापरीत आहे) समजावयाचे व नंतर त्यांच्यात पवित्र वाङ्मय व अपवित्र वाङ्मय असा भेदभाव अगोदर करावयाचा नाही पण केवळ सत्य शोधून काढण्याच्या हेतूने त्या वाङ्मयाला रूढ नियमांच्या कसाला लावून त्याची पाहणी परीक्षा करावयाची अशी इतिहासकारांची एक उत्कृष्ट परंपरा आहे." [७]

**इतिहासकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे इतिहासाचे गाढे अभ्यासक होते. इतिहासकार कसा असावा याबाबत ते म्हणतात "an historian ought to be exact, sincere, and impartial; free from passion, unbiased by interest, fear, resentment or affection; and faithful to the truth, which is the mother of history, the preserver of great actions, the enemy of oblivion, the witness of the past, the director of the future. In short he must have an open mind, though it may not be an empty mind, and readiness to examine all evidence even though it be spurious." [8] म्हणजेच इतिहासकार हा काटेकोर, तळमळीचा आणि पंक्तीप्रपंच न करणारा असा असला पाहिजे. तो भावनाविरहित, आपुलकीची भावना, भीती, तिरस्कार किंवा प्रेमाची ओढ यांच्यापासुन मुक्त असा असला पाहिजे. महत्कृत्यांना सुरक्षित ठेवणारा अंधाराचा संहार करणारा पुर्वकालाच्या साक्षी आणि भावी काळचा नेता असा तो असला पाहिजे. खोटे-नाटे पुरावे जरी त्याच्या हाती लागले तरी त्या सर्व पुराव्यांची छाननी करण्याची त्याची तयारी असली पाहिजे. आपण ज्या भारतीय इतिहासाचा अभ्यास येथे मांडत आहोत त्या क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे कार्य केलेले आहे त्याचा अभ्यास केला असता आपणास इतिहासाच्या पुर्न लेखनाविषयी त्यांची दृष्टी समजण्यास मदत होईल.

०१. **Ancient Indian Commerce (1914):** कोलंबिया विद्यापीठात एम. ए. पदवीकरीता सादर केलेल्या Ancient Indian Commerce या प्रबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राचीन काळात भारताचा व्यापार रोम व इतर युरोपीयन राष्ट्रांशी कसा भरभराटीचा होता आणि औद्योगिक क्रांतीपर्यंत पुर्वेकडील देश सर्व जगाला माल विकणारा कारखानाच होता असे रामविलास शर्मा यांचे मत अधोरेखीत करतात पुढे ते ज्ञान आणि प्रगतीच्या आरंभाविषयी आर. सी. दत्त यांचे मत देताना म्हणतात, " It is in the valley of the Nile, the Euphrates, the Yangtse Kang and the Indus that we first witness the misty dawn of civilization, the beginning of knowledge and progress." To have caught the light from the East and reflected it with manifold

lustre on the West is the only work of Greece and Rome." इराकची फरात, चीनची यांग त्सी कियांग व भारतातील सिंधू नदी परिसरातील संस्कृती प्रगत होती. ज्ञान आणि प्रगतीची सुरुवातच येथून झालेली आहे. ग्रीक आणि रोमन लोकांनी या ज्ञानाच्या प्रकाशाची चमक पाश्चिमात्य जगतापर्यंत पोहचवण्याचे कार्य केलेले आहे.[9] पुढे जावून ते प्राचीन भारतीय व्यापारासंदर्भातील भारतीय साधनांच्या कमतरतेची खंत मांडताना म्हणतात "At the outset it would be better to take note of the lampposts or the sources that will help us in our survey. On the nature side there is a lamentable paucity. The Hindoos are loquacious on everything except the economic activity of their life and the reason is not far to see. Education was monopolized by a class of people who were more or less "drones in the hive, gorging at a feast to which they [had] contributed nothing". The Brahamin or the intellectual caste of India enjoyed "the conspicuous leisure" and "the conspicuous consumption" vicariously; consequently the economic activity of the ancient Hindoos found no exponents and no mention in the literature which is purely sacerdotal. This also explains why India did not produce any literature on the Science of Economic as such. Hence we are compelled to depend entirely on foreign authorities and their scanty reference to India's commerce. प्राचीन भारतात ब्राम्हणांनाच शैक्षणिक संधी असल्याने त्यांनी धार्मिक वाङःमय निर्माण केले. त्या वाङःमयामध्ये आर्थिक बाबींचा उल्लेखच नसल्याने आम्हास प्राचीन भारताच्या व्यापाराच्या माहीतीसाठी परकीय साधनांचा आसरा घ्यावा लागतो.[10]

**02. CASTES IN INDIA Their Mechanism, Genesis And Development (9th May 1916) :** अमेरिकेतील कोलंबीया विद्यापीठात ९ मे १९१६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातीः त्यांची घडण, उत्पत्ती आणि प्रसार या शोधनिबंधामध्ये भारतातील जातींच्या इतिहासाचा परामर्श घेऊन तत्कालीन पाश्चात्य अभ्यासकांनी 'जात' या संकल्पनेची काय मीमांसा केलेली आहे याचा आढावा घेतात. हा संदर्भ देऊन पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर "एकाच जातीमध्ये विवाह करण्याची व्यवस्था अर्थातच जातीअंतर्गत विवाह हे जातीच्या उत्पत्तीचे मुख्य कारण आहे." असा आपला जातीच्या उत्पत्तीचा सिध्दांत मांडतात.[11] याच शोधनिबंधाचा शेवट करताना ते म्हणतात, "For myself I shall find as much pleasure in a positive destruction of my own idealogy, as in a rational disagreement on a topic, which, notwithstanding many learned disquisitions is likely to remain controversial forever. To conclude, while I am ambitious to advance a Theory of Caste, if it can be shown to be untenable I shall be equally willing to give it up."[12] म्हणजेच "जिथपर्यंत माझा संबंध आहे तेथपर्यंत मी सांगू इच्छितो की, एखाद्याचा बुध्दीवादी दृष्टीकोनांतून माझ्याशी मतभेद झाला तर माझे विचार

सोडून देण्यातही मला आनंदच होईल. सारांश, जातीची उत्पत्ती मांडण्याची माझी ज्याप्रमाणे आकांक्षा आहे, त्याप्रमाणेच ती समर्थनीय नाही असे दाखवून दिले तर मी ती सोडून देण्यासही तयार आहे." या विधानातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर एखादया घटनेस पुरावा देऊन ती मांडण्याचा किंवा खोडून काढण्याचे मत स्पष्टपणे मांडतात. इतकेच नव्हे तर जर एखाद्याचे मत पुराव्यानीशी खोडून काढले तर ते सोडून दयावे असेही मत ते देतात आणि पुराव्यानुसारच 'घटना' हा इतिहासाचा गाभाच आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे मत इतिहासकार या नात्याने अत्यंत महत्वपुर्ण आहे.

**3. ANNIHILATION OF CASTE WITH A Reply to Mahatma Gandhi (1936) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जातपात तोडक मंडळ लाहोर या मंडळाच्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षीय मनोगतासाठी तयार केलेले भाषण म्हणजेच 'जातीसंस्थेचे उच्चाटन' होय. या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातीव्यवस्थेला श्रमविभाजनाशी जोडणा-या सिध्दांताची मीमांसा करतात. ते म्हणतात. "It is defended on the ground that the Caste System is but another name for division of labour and if division of labour is a necessary feature of every civilized society then it is argued that there is nothing wrong in the Caste System. Now the first thing is to be urged against this view is that Caste System is not merely division of labour. It is also a division of labourers." [13] अर्थात जातीव्यवस्थेचे समर्थन करणारे अनेक विद्वान जातीसंस्था म्हणजे कामांची केलेली विभागणी होय असे मत मांडतात. या सिध्दांताच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की ही कामांची केलेली विभागणी नसून ही काम करणा-या श्रमीकांचीच विभागणी आहे. याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच ग्रंथामध्ये पुढे जातीसंस्था टिकवण्यासाठी वंशश्रेष्ठत्व, आर्थिक क्षमता वाढ हे वेळोवेळी आलेले विविध मुद्दे ते पुराव्यानिशी खोडून काढतात.

**4. WHO WERE THE SHUDRAS? How they came to be the Fourth Varna in the Indo-Aryan Society :** ख-या अर्थाने सामाजिक इतिहासाची मांडणी करणारा 'शुद्र पुर्वी कोण होते? हा ग्रंथ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४६ साली प्रकाशित केला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेतच त्यांनी भारताच्या प्राचीन इतिहासावर भाष्य केलेले आहे. शुद्रांच्या उत्पत्ती पासून त्यांच्या हिंदी-आर्य समाजातील चौथा वर्ण होईतोपर्यंतची वाटचाल त्यांनी मांडलेली आहे. "The Western writers have proceeded to invent the story of the invasion of India by the Aryans and the conquest by them of the Dasas and Dasyus." [14] म्हणजेच पाश्चात्य लेखकांनी आर्य हे सर्वश्रेष्ठ होते आणि त्यांनी भारतावर आक्रमण करून येथिल सर्व दास आणि दस्यू यांचा पराभव केल्याचा सिध्दांत मांडलेला होता.

या सिध्दांताच्या समर्थनार्थ युरोपियन ग्रंथकार काही मते मांडतात ती पुढीलप्रमाणे आहेत. पहिले मत असे आहे की काही भारतीय भाषा आणि युरोपीयन भाषांमध्ये साम्य आढळते. भारतातील काही या लोक भाषा बोलतात अशा भाषांना ते हिंदी जर्मन भाषा असे म्हणतात. यावरून वैदिक भाषा म्हणजे आर्यांची भाषा आणि आर्य लोक म्हणजे हिंदी जर्मन लोकांचा मुळचा वंश आहे. दुसरे मत म्हणजे आर्यांनी भारतावर स्वारी करून येथिल अनार्य दास व दस्यू लोकांना पराभूत केले व आपले वर्चस्व निर्माण केले. तिसरे मत म्हणजे आर्य वर्णाने गोरे होते व भारतात येऊन स्थाईक झाल्यावर त्यांनी वर्णाधिष्ठीत म्हणजेच व्यक्तीच्या रंगावर आधारीत समाजाची रचना केली. "The Brahmin believes in the two-nation theory. He claims to be the representative of the Aryan race and he regards the rest of the Hindus as escendants of the non-Aryans. The theory helps him to establish his kinship with the European races and share their arrogance and their superiority. He likes particularly that part of the theory which makes the Aryan an invader and a conqueror of the non-Aryan native races. For it helps him to maintain and justify his overlordship over the non-Brahmins." [15] ब्राम्हण ग्रंथकारांनी या युरोपियन सिध्दांताला उचलून धरले कारण ब्राम्हणांची व्दिराष्ट्रवादास मान्यता आहे. आपण आर्य वंशाचे आहोत आणि बाकीचे हिंदू अनार्य वंशाचे आहेत असा ब्राम्हणांचा दावा आहे. युरोपियन ग्रंथकारांचा दावा मान्य केला म्हणजे आपण युरोपियन वंशाचे नातालग ठरतो व त्या मानाने युरोपियन लोकांप्रमाणे अनार्याबद्दल अनियंत्रित सत्ता गाजवायला आपणाला अधिकार मिळतो असा ब्राम्हणांचा समज झाला असावा. आर्यांनी हिंदुस्थानवर स्वारी करून तेथील रानटी अनार्यांना जिंकले हा जो सिध्दांताचा भाग आहे तो तर ब्राम्हणांना फारच आवडला आहे. कारण ब्राम्हणेतरांवर पुर्वी ब्राम्हणांचे जे श्रेष्ठत्व अनेक वर्षापासून स्थापन झाले आहे त्याला पुष्टीदायक पुरावा त्या भागात मिळतो म्हणून त्या भागाला ब्राम्हण लोक विशेष महत्व देतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सिध्दांताचा विरोध करतात. त्यांनी या युरोपीअन सिध्दांताला त्याच्या प्रत्येक मताला वेद, उपनिषद, पुराणे, महाकाव्ये आणि इतर ग्रंथांचा आधार घेऊन खोडून काढलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महत्वाचा सिध्दांत म्हणजे 'शुद्र वर्ग हा आर्य होता.' त्यांच्या या मताला आधार देताना ते प्रो. वेबर यांनी दिलेल्या the Shudras as an Aryan tribe which immigrated into India before the others." या संदर्भाचा हवाला देऊन पुढे ते म्हणतात, "His conclusion that the Shudras were Aryans hits the nail squarely on the head. The only point of doubt is whether the Shudras were a tribe. That they were Aryans and Kshatriyas is beyond doubt." [16] शुद्र हे आर्य होते असा प्रो. वेबर यांनी निष्कर्ष काढला आहे तो शंभर टक्के

बरोबर आहे. शुद्र हा शब्द एका टोळीचे नाव दर्शविणारा शब्द होता की काय हा एकच संशयास्पद मुद्दा शिल्लक राहतो. परंतू शुद्र हे आर्य व क्षत्रिय होते, यात तिळमात्र संशय नाही.

**5. The Untouchables: Who were they and why they became Untouchables? (1948)** ह्या १९४८ साली प्रकाशित केलेल्या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांच्या प्रश्नांचा उहापोह करतात. ज्याप्रमाणे हिंदूमध्ये अस्पृश्यता आहे त्याचप्रमाणे हिंदु शिवाय इतर ठिकाणी असणारी अस्पृश्यता ते स्पष्ट करतात. सन १९४८ पर्यंत अस्पृश्यांचा वंशच वेगळा असल्याचा सिध्दांत मांडला जात होता. हा सिध्दांत कसा चूकीचा आहे याचे स्पष्टीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर देताना प्रो. रिश्ले यांनी महाराष्ट्रातील व श्री. रोज यांनी पंजाब प्रांतात केलेल्या अध्ययना नंतर या दोन्ही ठिकाणी आलेले निष्कर्ष सांगतात. महाराष्ट्रतील उच्च वर्णिय आणि अस्पृश्य हे एकाच कुळातील तर आणि पंजाबातील उच्च वर्णिय आणि अस्पृश्य एकाच गोत्रातील असल्याचे मानववंशशास्त्रीय तपासणीत सिध्द झालेले आहे. "As I have said if totem, kul, and gotra, have any significance it means that those who have the same totem must have been kindred. If they were kindred they could not be persons of different race. The racial theory of the origin of Untouchability must, therefore, be abondoned." [17] या सर्व बाबी लक्षात घेता डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांच्या निर्मितीसंदर्भात असणा-या वांशिक सिध्दांताला अमान्य करतात. याच ग्रंथात पुढे ते श्री. राईस यांचा घाण कामांमुळे अस्पृश्यता निर्मीतीच्या सिध्दांताची मांडणी करतात, "According to Mr. Rice, the origin of Untouchability is to be found in the unclean and filthy occupations of the Untouchables." [18] श्री. राईस यांच्या मते घाण कामामुळे अस्पृश्यता निर्माण झाली. या अस्पृश्यता निर्मीतीच्या सिध्दांताची मीमांसा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर नारद स्मृती, याज्ञवल्क्यस्मृती आणि विज्ञानेश्वराच्या मिताक्षरा या ग्रंथांच्या आधारे चारही वर्णाचे लोक साफसफाईची कामे करत होती आणि त्यांच्या या कामांचा त्यांच्या वर्णावरती कोणताही प्रभाव पडत नव्हता हे स्पष्ट करतात.

Having regard to the duties prescribed for the slaves, this change in the law of slavery does not matter at all. It still means that a Brahmin if he was a slave, a Kshatriya if he was a slave, a Vaishya if he was a slave, did the work of a scavenger. Only a Brahmin would not do scavenging in the house of a Kshatriya, Vaishya or a Shudra. But he would do scavenging in the house of a Brahmin. Similarly, a Kshatriya would do scavenging in the house of a Brahmin and the Kshatriya. Only he would not do it in the house of a Vaishya or Shudra and a Vaishya would do scavenging in the house of a Brahmin, Kshatriya and Vaishya. Only he would not do it in the house of a Shudra. It is, therefore, obvious that the Brahmins, Kshatriyas and Vaishyas who are

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

admittedly the Aryans did the work of scavengers which is the filthiest of filthy occupations. If scavenging was not loathsome to an Aryan how can it be said that engaging in filthy occupations was the cause of Untouchability. The theory of filthy occupation as an explanation of Untouchability is, therefore, not tenable.[19] ब्राम्हण हा वर्णव्यवस्थेत सर्वात वरच्या स्थानी असल्याने तो खालच्या वर्णाच्या व्यक्तीकडे साफसफाईची कामे करत नसे. परंतू ब्राम्हणाकडे तो साफसफाईचे काम करू शकत असे. अशाच प्रकारे क्षत्रिय हा ब्राम्हण व क्षत्रियाकडे तर वैश्य हा ब्राम्हणाकडे, क्षत्रियाकडे आणि वैश्याकडे साफसफाईची काम करू शकत असे. फक्त शुद्राकडे त्याने काम करू नये असा दंडक होता. जर ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य हे आर्य असूनही त्यांना घाण असलेली साफसफाईची कामे करणे घृणास्पद नव्हते तर मग अस्पृश्यता निर्मीतीच्या मागे हे कारण असण्याच्या सिध्दांताचा विचार करणे सोडून द्यावे लागेल. अशाच प्रकारे ते अस्पृश्यतेची मुळे ही गोमांस भक्षणात असण्याचा सिध्दात विश्लेषित करतात.

या ग्रंथाच्या शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यतेची मुळे बौध्द धर्म आणि ब्राम्हणधर्मातील संघर्षात शोधतात आणि आपला अस्पृश्यतेच्या उगमाचा सिध्दांत मांडतात. We can, therefore, say with some confidence that Untouchability was born some time about 400 A.D. It is born out of the struggle for supremacy between Buddhism and Brahmanism which has so completely moulded the history of India and the study of which is so woefully neglected by students of Indian history.[20] आपण असे विश्वासाने म्हणू शकतो की साधारणतः इ.स.४०० या कालखंडात ब्राम्हणी धर्म आणि बौध्द धर्म यांच्यातील सर्वोच्चतेसाठी झालेल्या झगडयाचा परिणाम म्हणजे अस्पृश्यतेचा उदय होय. ज्या इतिहासाने भारताला आकार दिला त्याच इतिहासाकडे भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांचे दुर्लक्ष झालेले आहे.

**6. Revolution and Counter-Revolution in Ancient India:** क्रांती आणि प्रतिक्रांती या ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताच्या प्राचीन इतिहासाला दिलेल्या पौराणिक मुखवटयावर हल्ला करतात. त्यांच्या मते देव, दानव, यक्ष, गण, गंधर्व आणि किन्नर हे लोक कोण होते? ...... प्राचीन भारतात 'नाग' लोक कोण होते? प्राचीन भारताच्या इतिहासावरून काल्पनिकतेचे आवरण दुर करणे अत्यावश्यक आहे. हे आवरण दुर केल्याशिवाय भारताच्या वास्तविक इतिहासाचे दर्शन होणार नाही. मनुपुर्व कालखंडात शुद्रांना मंत्री किंवा राजा होता येत होते हे पैजवान आणि सुदास या शुद्र राजांचे उदाहरण देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिध्द करतात. याचप्रमाणे मनुपुर्व कालखंडात स्त्रीयांनाही समाजात सन्मानाचे व पुरूषांच्या बरोबरीचे स्थान असल्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. याकरीता ते अथर्ववेदातील एक श्लोकाची माहिती देताना सांगतात, "That a woman was entitled to Upanayan is clear from the Atharva Veda where a girl is spoken of as being eligible for marriage

having finished her Brahmacharya. From the Shrauta Sutras it is clear that women could repeat the Mantras of the Vedas and that women were taught to read the Vedas.........The story of public disputation between Janaka and Sulbha, between Yajnavalkya and Gargi, between Yajnavalkya and Maitrei and between Shankaracharya and Vidyadhari shows that Indian women in pre-Manu's time could rise to the highest pinnacle of learning and education." [21] अथर्ववेदात हे स्पष्ट लिहिले आहे की, स्त्रीयांना सुध्दा उपनयनाचा अधिकार प्राप्त होता.........श्रौत सुत्रावरून हे स्पष्ट होते की, स्त्रियांसुध्दा वेद मंत्रांचे वाचन करून अभ्यास देखील करू शकत. अशा प्रकारचे शिक्षणसुध्दा स्त्रियांना देण्यात येत असे.........जनक आणि सुलभ, गार्गी आणि याज्ञवल्क आणि मैत्रेयी तसेच शंकराचार्य आणि विद्याधरी यांच्यामधील शास्त्रीय वादविवादांच्या घटनांवरून हे सिध्द होते की, मनुपूर्व कालखंडात स्त्रिया शिक्षण आणि ज्ञानाच्या उच्च शिखरांवर पोहोचलेल्या होत्या.

**निष्कर्ष**

इतिहासाचे पुर्नलेखन करण्याची प्रक्रिया कोणास आवडो ना आवडो चालू झालेली आहे. एखाद्या घटनेच्या, वस्तूच्या संदर्भात अनेजण विचार करतात. या सर्व विचारातूनच नवीन शोध लागतात. आजवर राजे-रजवाडे आणि त्यांच्या लढाया यांनाच इतिहासात महत्वाचे स्थान होते परंतू पुढे जावून वंचितांचा इतिहास ही नवी अभ्यासप्रणाली पुढे आलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानव्यशाखेतील धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, कायदा, न्याय, संविधान, तत्वज्ञान, भाषा आणि प्राचीन साहित्य व इतिहास यांचे व्यासंगी होते. या व्यासंगातूनच त्यांच्या व्यापक तत्वज्ञानाची बैठक तयार झालेली होती. त्यामुळे त्यांनी मांडलेले तत्वज्ञान केवळ स्वतःसाठी नव्हते, तर व्यक्ती, समाज आणि राष्ट्र उध्दाराची सर्वसमावेशकता त्यात होती. इतिहासाच्या संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रसिध्द वक्तव्य म्हणजे 'जे स्वतःचा इतिहास विसरतात ते कधीच इतिहास घडवू शकत नाहीत. अशा पध्दतीने इतिहासाकडे पाहणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इतिहासाच्या क्षेत्रातील योगदान अभ्यासले असता त्यांनी लिहीलेल्या अनेक ग्रंथांतून आपणास ते भारतीय इतिहासाचे पुर्नलेखन करताना दिसतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतिहासाच्या लेखनाविषयी मत मांडताना म्हणतात "सुसंबध्द व आवश्यक घटना उपलब्ध झाल्यास गोथेचे मार्गदर्शन अमलात आणण्यास काहीच अडचण पडत नाही. अर्थातच हा सर्व सल्ला अत्यंत मोलाचा व आवश्यकही आहे. परंतू जेव्हा घटनांच्या जंत्रीमधील तुटलेल्या दुव्याजवळ एखादा संशोधक येऊन अडखळतो आणि जेव्हा दोन महत्वाच्या घटनांमधील संबंध दाखवणारा प्रत्यक्ष पुरावा उपलब्ध असतो तेव्हा त्या इतिहास संशोधकाने काय करावे हे गोथे सांगत नाही. मी याचा उल्लेख करण्याचे कारण असे की, अस्पृश्यतेचे मुळ शोधण्याचा व त्याच्याशी संबंधीत अनेक प्रश्नांचा शोध घेत असताना अशा अनेक तुटलेल्या दुव्यांशी मला झटपट करावी लागली

आहे. त्यांच्याशी झटापट करणारा मी एकटाच नाही हे खरे आहे. भारताच्या प्राचीन इतिहासाच्या सर्वच विद्यार्थ्यांना अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागते. कारण माऊंट स्टुअर्ट एलफिस्टन म्हणतो त्याप्रमाणे "अलेक्झांडर येण्यापुर्वीच्या भारताच्या इतिहासातील कोणत्याही सार्वजनिक घटनेची तारीख निश्चित करणे कठीण आहे आणि मुसलमानांच्या अधिपत्यांपूर्वीच्या काळातील नैसर्गिक उत्क्रांतीचा सुसंबध्द क्रम लावण्याचा प्रयत्न करता येणे शक्य नाही." ही खेदजनक कबुली आहे. परंतु त्याला इलाज नाही. प्रश्न असा की, इतिहासाच्या विद्यार्थ्याने करावे तरी काय? ऐतिहासिक घटनेचा गळलेला दुवा सापडेपर्यंत त्याने स्वतःला 'आराम'चा हुकूम द्यावा काय? मला तसे वाटत नाही. अशा प्रसंगी त्याने शक्य त्या कल्पनाशक्तीचा व प्रतिभेचा उपयोग करून घ्यावा व त्याव्दारे अधिक असंशोधित असलेल्या ऐतिहासिक दुव्यांची साखळी जोडावी आणि ज्या घटनांचे दुवे सापडत नाहीत ते उपलब्ध घटनांव्दारे पाहता कसे असू शकतील याचे अनुमान प्रस्तुत करावे. संशोधनाचे कार्य खोळंबून ठेवण्यापेक्षा या युक्तीव्दारे तुटलेल्या दुव्यामुळे निर्माण झालेल्या अडचणीतून मार्ग काढणेच मी पसंत केले आहे हे मी मान्य करतो." [२२]

कोणत्याही विचाराला व्यक्तिने कायमस्वरूपी चिटकून राहु नये. कालानुरूप त्यातील योग्य-अयोग्य काय? किंवा आजच्या युगात त्या मताची खरोखर आवश्यकता आहे काय? याचा आढावा घेणे आवश्यक असल्याचे मत मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "सातत्य हा गाढवाचा गुण असतो. कोणताही विचारी माणूस आपल्या पूर्वी व्यक्त केलेल्या मताशी सातत्याच्या नावाखाली स्वतःला बांधून घेत नसतो. सातत्यपेक्षा जबाबदारी ही अधिक महत्वाची असते. जबाबदार माणसाने आपण जे शिकलो ते विसरायला शिकलेच पाहिजे. जबाबदार माणसाकडे पुर्नविचार करण्याचे आणि आपले विचार बदलण्याचे धाडस असलेच पाहिजे. अर्थात त्यासाठी पुरेशी आणि चांगली कारणे असली पाहिजेत. विचारात शेवटचा शब्द अशी कोणतीही गोष्ट नसते" [२३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशस्थीतीचा विचार वेळोवेळी केला आहे. देशाच्या भुगोलापेक्षाही देशाचा इतिहास त्यांच्या चिंतनाचा विषय होता. एखादे राष्ट्र हजारो वर्षे जगते हा अधिक चिंत्य विषय आहे असे ते म्हणत. आम्ही शास्त्राप्रमाणे वागलो म्हणून जगलो हया सत्यावर मार्मिकपणे बोट ठेवताना डॉ. बाबासाहेबांनी पुराण इतिहासाचा व्यर्थ व कृतक गौरव करणा-या प्रवृत्तीचा निषेध केला आहे. इतिहासातील घटनांना पूर्वनिश्चित भूमिकेतून न स्विकारता घटनांचा अर्थ आणि अन्वयार्थ लावणे प्राप्त साधनांच्या माध्यमातून वस्तूनिष्ठ चिकित्सा करणे आणि मांडणी करणे तसेच इतिहासाची कारणमिमांसा बुध्दीप्रामाण्यवादातून करणे ही त्यांच्या विचार करण्याची आणि लेखनाची शिस्त होती. इतिहासाची कल्पनारम्यता त्यांना मान्य नव्हती. समाज व धर्म या संकल्पना त्यांनी भिन्न भिन्न मानल्या ते इतिहासाचा समाजशास्त्राचा आणि धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास करूनच. [२४] त्यांच्या लेखानाविषयी भाष्य करताना रामविलास शर्मा म्हणतात, "डॉ. आंबेडकरांनी लिखाण करून अनेक नवीन सिध्दांत भारतीय इतिहासात मांडलेले दिसतात. त्यांचे भारतीय

इतिहासावरील संशोधनात्मक कार्य अत्यंत महत्वपुर्ण आहे. त्यांनी जे लिहिलेले आहे त्या लेखनाचा सरळ संबंध आजच्या भारत आणि भारताच्या इतिहासाशी आहे."[१५]

वरील सर्व विवेचनाचा अभ्यास करता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय इतिहासावर मोठ्या प्रमाणावर लेखन केलेले आहे. या लेखनात बुध्दीप्रामाण्यवाद लोकशाही मुल्यव्यवस्था तर्कनिष्ठा या शेवटापर्यंत केंद्रस्थानी होत्या. भारतीय समाजाच्या विचाराचा प्रारंभ वर्गापासून व्हावा आणि तो वर्ण जाती अस्पृश्यता या क्रमाने पोटजातीपर्यंत यावा ही त्यांना अपेक्षा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाचा सामाजिक इतिहास तपासला आणि त्या तपासणीत त्यांना वर्ग जाणीव, वर्गसंघर्ष आणि वर्गयुध्द या गोष्टी आढळल्या. ज्या आजपर्यंत आढळुन आलेल्या होत्या परंतू जाणीवपुर्वक त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलेले होते. या इतिहास मिमांसेचेही कठोर परिक्षण व्हावे. जर कोणी याहून चांगली इतिहासमिमांसा करणार असेल तर त्याचे स्वागत व्हावे अशी त्यांची भूमीका असल्याचे त्यांच्या लिखाणात ठिकठिकाणी जाणवते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथमतः त्या इतिहासाची पुर्नमांडणी करून भारतीय इतिहासाला एक नवी दिशा दिली परंतू आज त्यांनी दिलेल्या परिवर्तनाच्या विचारांचा वारसा मात्र क्षीण होत असलेला दिसतो आहे.

**संदर्भ**

१. वराळे बळवंत हनुमंतराव डॉ. आंबेडकरांचे सांगाती श्री विद्या प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती १९८८ पृ.१०
२. डॉ. आंबेडकर बी. आर. अस्पृश्य मुळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे झाले? मुक्तांगण प्रकाशन पुणे व्दितियावृत्ती २०१६ पृ.९-१०
३. डॉ. आंबेडकर बी. आर. रायटींग ॲण्ड स्पिचेस, खंड ३ पृ१०४-५
४. कसबे रावसाहेब आंबेडकरवाद : तत्व आणि व्यवहार सुगावा प्रकाशन पुणे व्दितियावृत्ती २००४ पृ.११
५. कसबे रावसाहेब आंबेडकरवाद : तत्व आणि व्यवहार सुगावा प्रकाशन पुणे व्दितियावृत्ती २००४ पृ.१२
६. डॉ. आंबेडकर बी. आर. शुद्र पुर्वी कोण होते नेहा प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती २००५ पृ.१७
७. डॉ. आंबेडकर बी. आर. शुद्र पुर्वी कोण होते नेहा प्रकाशन नागपूर प्रथम आवृत्ती २००५ पृ.१६
८. Vasant Moon, Edited, WHO WERE THE SHUDRAS? How they came to be the Fourth Varna in the Indo-Aryan Society, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol.7 by First Edition by Education Department, Govt. of Maharashtra: 14 April, 1993, Re-printed and Published by Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi - 110 001, January, 2014, P.17

९. Vasant Moon, Edited DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol. 12 by First Edition by Education Department, Govt. of Maharashtra : 14 April, 1993 Re-printed and Published by Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi - 110 001, January, 2014, P.4

१०. Vasant Moon, Edited DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol. 12 by First Edition by Education Department, Govt. of Maharashtra : 14 April, 1993 Re-printed and Published by Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi - 110 001, January, 2014,P.6

११. Vasant Moon, Edited, CASTES IN INDIA, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol.1 by First Edition by Education Department, Govt. of Maharashtra : 14 April, 1993 Re-printed and Published by Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi - 110 001, January, 2014,P.9

१२. Vasant Moon, Edited, CASTES IN INDIA, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol.1 by First Edition by Education Department, Govt. of Maharashtra : 14 April, 1993 Re-printed and Published by Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi - 110 001, January, 2014,P.22

१३. Vasant Moon, Edited, ANNIHILATION OF CASTE WITH A Reply to Mahatma Gandhi, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol.1 by First Edition by Education Department, Govt. of Maharashtra: 14 April, Re-printed and Published by Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi - 110 001, January, 2014, P.47

१४. Vasant Moon, Edited, WHO WERE THE SHUDRAS? How they came to be the Fourth Varna in the Indo-Aryan Society, DR. BABASAHEB AMBEDKAR WRITINGS AND SPEECHES Vol.7 by First Edition by Education Department, Govt. of Maharashtra: 14 April, 1993 Re-printed and Published by Dr. Ambedkar Foundation Ministry of Social Justice & Empowerment, Govt. of India 15, Janpath, New Delhi - 110 001, January, 2014, P.79